International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor – 7.328
Vol.9 No.1 Sept – Oct 2021

# शाश्वत विकाससमोरील आव्हाणे व उपाययोजना

**डॉ. अश्विनी संदिप उगले**

लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालय, दहिगांव ने

ईमेल- deshmukha544@gmail.com

**गोषवारा:**

भारतीय अर्थव्यवस्था ही अमेरिकन डॉलरच्या विनिमय दरानुसार 5 व्या क्रमांकाची अर्थव्यवस्था आहे. त्यात सेवाक्षेत्राचा विकास हा भारतात मोठया प्रमाणात म्हणजे 54.4 टक्के इतका झालेला आहे. म्हणजेच भारतीय अर्थव्यवस्थेची प्रगती दिवसेंदिवस वाढत चाललेली दिसुन येत आहे. परंतु देशाचा फक्त विकास होणे महत्वाचे नाही तर शाश्वत विकास होणे गरजेचे आहे. आज कमीत - कमी कालावधीत जास्त विकास करण्यापेक्षा शाश्वत विकासाची गरज मोठया प्रमाणावर दिसून येते. जागतिक पातळीवर पर्यावरणाची होत असलेली हानी लक्षात घेवून संयुक्त राष्ट्र संघटनेने शाश्वत विकास करण्यावर भर दिला. मानवी समाजाच्या आजवरच्या जडणघडणीत पर्यावरणीय व्यवस्थेसोबत निर्माण झालेली दरी मिटवणे हे सगळयात मोठे आव्हाण आहे. म्हणून शाश्वत विकासासाठी समाजात जागरूकता निर्माण करणे आवश्यक आहे.

**प्रस्तावना:**

भारतीय अर्थ व्यवस्था ही कृषी प्रधान अर्थव्यवस्था आहे. 1991 च्या नविन आर्थिक धोरणानंतर भारताने विकासाच्या दिशेने जोरदार पाउले उचललेली दिसून येते. अर्थव्यवस्थेचा समतोल विकास व्हावा तसेच देशाच्या नैसर्गिक साधनसंपत्तीचा सर्वांना समान उपयोग व्हावा ही भारतीय अर्थव्यवस्थेची उद्दिष्टे आहे. भारतीय अर्थव्यवस्था ही अमेरिकन डॉलरच्या विनिमयाच्या दरानुसार जगातील 5 व्या क्रमांकाची अर्थव्यवस्था आहे. त्यात सेवाक्षेत्राचा विकास हा भारतात मोठया प्रमाणावर म्हणजे 54.4 टक्के इतका झालेला आहे. उदयोग क्षेत्राचा विकास हा 29.5 टक्के तर शेतीक्षेत्राचा विकास हा 16.1 टक्के एवढा झालेला दिसून येतो. म्हणजेच भारतीय अर्थव्यवस्थेची प्रगती दिवसेंदिवस वाढत चाललेली आहे. परंतु देशाचा फक्त विकास होणे महत्वाचे नाही तर शाश्वत विकास होणे गरजेचे आहे. म्हणूनच शाश्वत विकास म्हणजे काय ? शाश्वत विकासातील अडथळे कोणती

आहे ? शाश्वत विकासासाठी कोणत्या उपाययोजना करता येतील ? या सर्व प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोध-निबंधात करण्यात आलेला आहे.

**व्याख्या:**

1. ''जो विकास चालु पिढीच्या गरजा हया पुढील पिढीच्या गरजा धोक्यात न आणता पूर्ण करतो आशा विकासाला शाश्वत विकास असे म्हणतात.''
2. ''जो विकास मानवाच्या सध्याच्या व भविष्यातील गरजांची संतूलित पूर्ती करतो त्यास शाश्वत विकास असे म्हणतात.''
3. "मानवी गरजांचे चिरकाल टिकणारे समाधान आणि मानवी जिवनाच्या दर्जात सुधारणा साध्य करणे म्हणजे शाश्वत विकास होय."

खरे तर शाश्वत विकासाची योग्य संकल्पना करणे कठीण आहे. कारण त्यात अनेक घटक समाविष्ट आहे. विकास ही काही मर्यादित संकल्पना आहे. आर्थिक दृष्टया वाढ झाली की, विकास झाला असे आपण समजतो परंतू शाश्वत विकास हा आर्थिक विकासा पेक्षा मोठा आहे. कमी कालावधीत झालेला विकास हा जास्त काळ टिकू शकत नाही म्हणूनच शाश्वत विकास करणे आवश्यक ठरले आहे. शाश्वत विकास हा भारतीय रणनितीचा गाभा आहे.

**शाश्वत विकासाचे महत्व:**

भविष्यतील पिढयांसाठी पर्यावरणाच्या गुणवत्तेशी तडजोड न करता देशाच्या विकासाचा दृष्टीकोन म्हणुन शाश्वत विकासाची व्याख्या केली जाऊ शकते आज आर्थिक विकासाच्या नावाखाली पर्यावरणाची हानी, जमिनीचा -हास, मातीची धुप, जल व हवा प्रदुषण, जंगलतोड म्हणजेच निसर्गाची मोठया प्रमाणावर हानी झालेली दिसुन येते. त्याचा जागतिक पातळीवर दृष्य परिणाम झालेला दिसून येत आहे. म्हणुनच आज कमी कालावधीत जास्त विकास करण्यापेक्षा शाश्वत विकासाची गरज मोठया प्रमाणावर दिसून येते. शाश्वत विकासाकडे दुर्लक्ष करण कुणालाही परवडणार नाही. शाश्वत विकास नरजेआड करून केलेला विकास हा मानवजातीला सुख देणारा कधीच असू शकत नाही.

जागतिक पातळीवर पर्यावरणाची होत असलेली हानी लक्षात घेवुन संयुक्त राष्ट्र संघटनेने शाश्वत विकास करण्यावर भर दिला. 1972 मध्ये संयुक्त राष्ट्रची मानवी पर्यावरणावरील परिषद स्टॉकहोम या ठिकाणी घेण्यात

आली. 1980 मध्ये IUCN ने प्रसिध्द केलेल्या जागतिक संवर्धन रणनिती मध्ये शाश्वत विकास यावर भर दिला. 1983 मध्ये जागतिक पर्यावरण व विकास आयोगाची स्थापना करण्यात आली हा आयोग पृथ्वीवरील सामाजिक पर्यावरणीय समस्यांचे निरिक्षण करून त्यावर वास्तववादी उपाय योजणा करणे आणि पृथ्वीवरील संसाधने पुढील पिढयांसाठी राखून त्याचा उपयोग चालु पिढीसाठी शाश्वतरित्या कसा करता येईल त्यावर उपाययोजना शोधण्यासाठी नेमण्यात आला. 1972 मध्ये 'रिओ दि जेनेरी' येथील वसुंधरा शिखर परिषदेत शाश्वत विकासाचा पाठपुरावा करण्यासाठी शाश्वत विकास आयोग स्थापन करण्यात आला. मानवी विकास अहवालात शाश्वत विकासात आर्थिक वृध्दीची संकल्पना अभिप्रेत आहे. ही संकल्पना विशिष्ट व्यवसापुरतीच मर्यादित न ठेवता सर्वच व्यवसायाठी लागू केली आहे. शाश्वत विकासासाठी स्थानिक, राष्ट्र  आणि जागतिक स्तरावर पर्यावरणीय बदल आवश्यक आहे परंतु शाश्वत विकासाच्या प्रक्रियेत अनेक आव्हाणे आहेत. मानवी समाजाच्या आजवरच्या जडणघडणीत पर्यावरणीय व्यवस्थेसोबत निर्माण झालेली दरी मिटवने हे सगळयात मोठे आव्हाण आहे.

**शाश्वत विकासातील आव्हाणे:**

जागतिक विकास उद्दिष्टय साध्य करण्याच्या दिशेने प्रत्येक देश लक्षणिय पाउले उचलत आहे. शाश्वत विकासाठी आर्थिक, समाजिक, तांत्रिक, लोकसंख्या शास्त्रीय आणि पर्यावरणीय आव्हाणांना सामोरे जावे लागत आहे.

**लोकसंख्या वाढ:**

जसजशी जगातील लोकसंख्या वाढत आहे तसतशी नैसर्गिक संसाधनावरील ताण-तणाव देखील वाढत आहे. जगातील एकुण लोकसंख्या अंदाजे 7.7 अब्ज आहे. त्यापैकी भारताची लोकसंख्या अंदाजे 1.32 अब्ज एवढी आहे. एवढया मोठया लोकांकडून हे स्त्रोत मोठया प्रमाणावर वापरले जात आहे. त्यामुळे हे स्त्रोत फार काळ टिकू शकत नाही. त्यामुळे आताच्या घडीला लोकसंख्यावाढ ही शाश्वत विकासा समोरील सर्वात मोठे आव्हाण म्हणून उभे आहे.

**नैसर्गिक संसाधनाचे शोषन:**

जसजशी लोकसंख्या वाढत आहे त्या वाढत्या लोकसंख्येच्या गरजा पूर्ण करण्यासाठी औदयोगिक क्रांती घडुन आली. त्या क्रांतीमुळे नैसर्गिक संसाधनाचा वापर वाढला. वाढत्या विकासाबरोबर नैसर्गिक संसाधनाचा

अतिवापर होवू लागला. आताच्या घडीला नैसर्गिक संसाधनाचा अतिवापर रोखणे हे सर्वात मोठे शाश्वत विकासासमोरील आव्हाण आहे.

**गरिबी:**

गरिबी ही समस्या भारतात औदयोगिक क्रांतीनंतर सर्वात जास्त प्रकर्षाने जाणवू लागली आहे. शाश्वत विकास करताना गरिबी व वंचित लोकांच्या समस्या लक्षात घेतल्या पाहिजे. भारतात श्रीमंत लोक अतिश्रीमंत होत चालले आहे तर गरीब हा गरीबच होत चालला आहे. भारतात ख-या अर्थाने शाश्वत विकास करायचा असेल तर गरिबी निर्मुलनासाठी प्रत्यक्ष अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

**नैसर्गिक संसाधनाचे असमान वितरण:**

विकसित देश  हे विकसनशिल व अविकसित देशांपेक्षा नैसर्गिक संसाधनाचा वापर जास्त प्रमाणात करताना दिसून येतात उदा. एकटया अमेरिकेची लोकसंख्या ही जगाच्या लोकसंख्येच्या 4 टक्के आहे. तरीही जगातील संसाधनापेक्षा 25 टक्के संसाधने अमेरिका वापरत आहे. त्याच प्रमाणे देशांतर्गत पाण्याचा असमान वापर दिसून येतो म्हणुन नैसर्गिक संसाधनाचे असमान वितरण हे शाश्वत विकासासमोरील आव्हाण आहे.

**शिक्षण / बेरोजगारी:**

भारतीय अर्थव्यवस्थेचा ज्याप्रमाणे पाया हा कृषीक्षेत्र आहे त्याचप्रमाणे अर्थव्यवस्थेचा मजबुत पाया म्हणुन शिक्षण क्षेत्राकडे बघितले जाते. भारतात शिक्षणाचे खाजगिकरण झाले. पूर्वीपेक्षा शिक्षित लोकांचे प्रमाण वाढले परंतु शिक्षणाबरोबर बेरोजगारीचे प्रमाण देखील दिवसेंदिवस वाढत आहे. भारतात छुपी बेरोजगारीचे प्रमाण मोठया प्रमाणावर दिसून येते. त्यामुळे भारतात ख-या अर्थाने शाश्वत विकासासमोरील आव्हाण म्हणुन बरोजगारी वाढते प्रमाण हे देखिल आहे.

**शासकिय धोरण:**

देशाच्या विकासासाठी सरकार प्रत्येक क्षेत्रात पाउले उचलत आहे. प्रत्येक समस्येवर विविध योजना व कार्यक्रम आखत आहे. शासकिय धोरणानुसार देशाचा विकास होत आहे. परंतु शाश्वत विकास मात्र होतनाही त्यासाठी सरकारने वस्तुचे उत्पादन करताना अपांरपारिक उर्जा साधने, सौर उर्जा, पवन उर्जा यासाठी समाजाला प्रोत्साहित करणे आवश्यक आहे.

**पर्यावरणाचा -हास व जागररूकताः**

आज जगाचा विकास मोठया झपाटयाने होत आहे. परंतु पर्यावरणाचा -हास मोठया प्रमाणात होत आहे. पर्यावरणाच्या -हासामुळे जागतिक तापमानात वाढ होत आहे. त्याचा दृष्यपरिणाम आत्ताच भोगावे लागत आहे. त्यामुळे जगाचा फक्त विकास नाही तर शाश्वत विकासासाठी समाजात जागरूकता निर्माण करणे आवश्यक असल्याचे दिसून येते.

**उपाययोजनाः**

भारतीय अर्थव्यवस्थेचा ख-या अर्थाने विकास करायचा असेल तर शाश्वत विकास करणे आवश्यक आहे. परंतु शाश्वत विकासासाठी अनेक अडचणी व आव्हाणांचा सामना करावा लागत आहे. ही आव्हाणे दूर करण्यासाठी पुढीलप्रमाणे उपाययोजना सुचवता येईल.

1. नुतणीकरणीय संसाधनासाठी वापराचा दर नूतनीकरणक्षम पर्यायांच्या उत्पादनाच्या दरापेक्षा जास्त नसावा.
2. नैसर्गिक संसाधनाचा अतिरिक्त वापर टाळून काटकसरीने वापर करणे आवश्यक आहे.
3. शहरे व मानवी वस्त्या अधिक समावेशक, सुरक्षित, लवचिक व शाश्वत करणे.
4. सर्वांना परवडणारी शाश्वत आणि आधुनिक उर्जासाधने उपलब्ध करून देणे.
5. शाश्वत सर्वसमावेशक आर्थीक वाढीला चालना देणे तसेच सर्वांना उत्पादनात वाढ करून रोजगार उपलब्ध करून देणे.
6. नैसर्गिक शाश्वत शेतीला प्राधान्य देणे.
7. शाश्वत विकासासाठी जागतिक भागिदारी निर्माण व्हावी यासाठी अमंलबजावणीची साधने विकसित करणे.
8. पर्यावरणीय गुणवत्ता वाढवणे.

**समारोपः**

थोडक्यात विकसनशिल देश म्हणुन ओळखला जाणारा भारत देश विकासाच्या दिशेने पाउल टाकत आहे परंतु भारताच्या सर्वांगिण विकासासाठी शाश्वत विकास करणे गरजेचे आहे. शाश्वत विकासाची तत्वे भारतासारखा विकाससमोरील अंगीकारणे आवश्यक आहे. शाश्वत विकाससमोरील आव्हाणे मानवी

अस्तित्वापुढील मोठे संकट म्हणुन उभे राहिले आहे. शाश्वत विकासाच्या या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी राजकिय, आर्थीक, पर्यावरण व अगदी कौटुबिक क्षेत्रासह सर्व क्षेत्रे सज्ज असणे आवश्यक आहे. भविष्यातील पिढयांसाठी पर्यावरणाच्या गुणवत्तेशी तडजोड न करता देशाच्या आर्थिक विकासाचा दृष्टीकोन म्हणुन शाश्वत विकासाची व्याख्या केली जाउ शकते. मानवी समाजाच्या आजवरच्या जडणघडणीत पर्यावरणीय व्यवस्थेबरोबर निर्माण झालेली दरी मिटवणे हे सगळयात मोठे आव्हाण आहे.

**संदर्भः**

1. https://hi.wikiepedia.org.wiki
2. Dr. S.M. Bhosale(2020): SUSTAINABLE DEVELOPMENT
3. www. economicdiscussion.net
4. Dr. R.H. Nagarkar (2020): Sustainable Development, An International Multidisciplinary
5. Journal Vol. 6
6. पुरी वी.के., मिश्र एस.के (2012) : भारतीय अर्थव्यवस्था, हिमालया पब्लिषिंग हाउस